
# यांनी घडविला इतिहास

मंगला दिघे



परी प्रकाशन

यांनी घडविला इतिहास

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२०१६

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | मगध साम्राज्याचा उदय | ३ |
| २. | गुप्त वंश | २२ |
| ३. | वर्धन वंश | २९ |
| ४. | प्रतापशाली रजपूत | ३७ |
| ५. | यादव वंश | ५२ |
| ६. | गुलाम वंश | ६० |
| ७. | खिलजी वंश | ६६ |
| ८. | मराठी रियासत | ७२ |
| ९. | पेशवाई | ८९ |
| १०. | मुघल रियासत | १०५ |
| ११. | मुस्लिम राज्यकर्ते | ११९ |
| १२. | पंधराव्या शतकातील राज्यकर्ते | १३३ |
| १३. | आपला समृद्ध भारत | १४६ |



# मगध साम्राज्याचा उदय

## सिकंदर आणि पोरस :

युरोप खंडात ग्रीस नावाचा एक लहानसा देश आहे. त्या देशात मेसिडोनिया नावाचं एक छोटंसं राज्य होतं. तेथील राजाचं नाव होतं फिलिप. तो फार पराक्रमी होता. त्यानं सगळा ग्रीस देश जिंकला. अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर हा या फिलिपचा पुत्र !

सिकंदर लहानपणापासूनच हुशार आणि पराक्रमी होता. वीस वर्षांचा असतानाच तो ग्रीस देशाचा राजा झाला, आपण सगळं जग जिंकावं अशी त्याची महत्त्वाकांक्षा असल्यामुळे राज्यावर बसताच त्यानं प्रचंड सैन्य बरोबर घेतलं आणि तो ग्रीस देशाबाहेर पडला. त्यानं अनेक देश जिंकले. इराण, अफगाणिस्तान हे देश जिंकून तो भारताच्या अगदी दाराशी येऊन पोहोचला. वाटेत जी जी राज्यं लागली ती सर्व त्यानं जिंकून घेतली. सिकंदराच्या सैन्यापुढे कोणाचा टिकाव लागला नाही. शेवटी आपलं सैन्य घेऊन विजयी सिकंदर भारताच्या सीमेवर येऊन उभा राहिला.



## सिकंदर भारतात आला त्यावेळी भारताची स्थिती काय होती ?

इ.स. पूर्व ६५० मध्ये मगध देशीचा राजा शिशुनाग हा राज्य करत होता. त्याचं राज्य छोटंसं होतं. राजगृह ही त्याची राजधानी होती. त्याच्या वंशातील बिंबिसार हा पाचवा राजा होता. त्यानं कोशल आणि पश्चिमेकडील काही राज्यं जिंकली. इ.स. पूर्व सहाव्या शतकात त्यानं आपल्या राज्यकारभारास सुरुवात केली. त्यानं आपल्या राज्याचा विस्तार दूरपर्यंत पसरवला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अजातशत्रू हा गादीवर बसला. बिहारपर्यंत त्यानं राज्यविस्तार केला.


बिंबिसारानं कोशलचा राजा प्रसेनजित् याच्या बहिणीशी विवाह केला; पण बिंबिसाराच्या मृत्यूनंतर प्रसेनजित् आणि अजातशत्रू यांच्यात लढाई झाली. लढाई संपल्यानंतर प्रसेनजित्नं आपल्या एका मुलीचा विवाह अजातशत्रूबरोबर लावून दिला. काही काळानंतर कोशल हे राज्य मगध राज्यात विलीन झालं. काशी राज्याची राजधानी होती सरस्वती नगर. ते राज्यही कोशल राज्यात विलीन झालं.

शिशुनाग– वंशानंतर नंदवंश मगधाच्या सिंहासनावर बसला. या वंशाचा मूळ पुरुष होता महानंदिन्. नंदवंशाचे राजे क्षत्रिय नव्हते. ते लहान जातीचे होते. नंदवंशीय राजांनी खऱ्या राजांना मारून राज्य प्राप्त केलं होतं. त्यांनी जवळजवळ नव्वद वर्षे राज्य केलं. सिकंदराच्या आक्रमणाच्या वेळी याच वंशाचा राजा महापद्मनंद मगध इथे राज्य करत होता. त्या मगधावर स्वारी करण्याचं सिकंदराचं स्वप्न मात्र अधुरं राहिलं.



पटांगणात सैन्य उभं होतं. त्या सैन्यातील सैनिक धिप्पाड आणि उंच होते. त्यांनी हातात शस्त्रं घेतलेली होती. त्यांच्या अंगात चिलखतं होती. डोक्यावर शिरस्त्राणं होती. कुणाच्या हातात तळपत्या तलवारी होत्या, कुणाच्या हातात तीक्ष्ण टोकांचे भाले होते. कुणी धनुष्यबाण घेतले होते. त्यांच्यासमोर वीस वर्षांचा तरुण राजा सिकंदर उभा होता. त्याची मुद्रा करारी होती. डोळे तेजस्वी होते. शरीर कसलेलं होतं. निश्चयी आवाजात तो सैनिकांना सांगत होता, ''मित्रांनो, आपल्याला सगळं जग जिंकायचं आहे. आपण ग्रीक वीर आहोत. मनात आणलं तर आपल्याला कठीण असं काहीच नाही. तुमच्या तलवारीचं पाणी शत्रूला दाखविण्याची वेळ आली आहे. कुणीही तुमच्याबरोबर युद्ध करू शकणार नाही, याबद्दल माझी खात्री आहे. चला तर, जग जिंकण्यासाठी चला. जो थांबला तो संपला. आपल्याला संपायचं नाहीये...''

सिकंदराचं बोलणं संपलं. त्याचं बोलणं खूप बाणेदारपणाचं झालं. त्याच्या बोलण्यात एक प्रकारचा जोश होता. प्रत्येक सैनिक त्याचे बोल आपल्या कानात साठवून ठेवत होता. त्याच्या भाषणानं सैनिकांना स्फुरण चढत होतं. त्यांचे बाहू युद्धासाठी सज्ज झाले होते. शत्रूला जिंकण्याचा त्वेष त्यांच्या अंगी चढला. त्या सगळ्या सैनिकांनी सिकंदराच्या नावाचा जयजयकार केला. ''आमच्या राजाचा जयजयकार असो ! पराक्रमी सिकंदराचा जयजयकार असो!''



धिप्पाड, उंच, काटक असे ते ग्रीक सैनिक होते. हातात शस्त्रास्त्र घेऊन ते आपल्या राजाबरोबर जग जिंकण्यास निघाले. सिकंदरानं आपल्या शूर सैनिकांना शिस्त लावली होती. त्यानं त्यांना युद्धकलेत निष्णात केलं.

आशियामायनर, सिरिया, इजिप्त, तुर्कस्तान, इराण इत्यादी देश त्यानं लवकरच काबीज केले.

आता सिकंदराची दृष्टी वळली ती हिंदुस्थानकडे. प्रवास कठीण होता. त्यानं खैबरघाट ओलांडला. आता तो सिंधू नदीच्या काठापर्यंत येऊन थडकला. अटकच्या वरच्या बाजूस काही मैलांवर त्यानं सिंधू नदी ओलांडली.

त्यावेळी हिंदुस्थानात कित्येक लहान राज्यं होती. पंजाबमध्ये सिंधू नदीच्या पूर्वेला तक्षशिला नावाचं राज्य होतं. अंभी हा तेथील राजा होता. याच वेळी झेलम आणि चिनाब या नद्यांच्या दुआबात एक प्रतापी राजा राज्य करत होता. त्याचं नाव होतं पोरस. अंभी आणि पोरस यांचं आपसात वैर होतं.

सिकंदर हिंदुस्थानात येत आहे हे अंभीनं ऐकलं. तो आपल्या प्रधानास म्हणाला, ''एक नामी संधी आहे...''

''कसली ?''

''सिकंदर हिंदुस्थानात येतोय.''

''माझ्या नाही लक्षात आलं.''

''आमचं आणि पोरसचं वैर आहे.''

''कल्पना आहे.''

''सिकंदराच्या मदतीनं पोरसचा सूड घेता येईल.''

''पण एका परकीय राजाची मदत...''

''आलेली संधी सोडून चालणार नाही.''

अंभीनं सिकंदरास पत्र पाठवलं. त्यात त्यानं आपला मानस स्पष्ट केला. खरं तर सिकंदराच्या सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे त्यानं ओळखलं होतं. तक्षशिला इथे त्याचं राज्य होतं. पत्राबरोबर त्यानं सिकंदरकडे मोठेमोठे नजराणे पाठवले.

तक्षशिलेत सिकंदराचं भव्य स्वागत झालं. तो दिपून गेला. तिथे त्यानं मोठा दरबार भरवला. या दरबारात येण्यासाठी त्यानं पोरस ऊर्फ पुरूला आमंत्रण दिलं.

पुरू मोठा स्वाभिमानी राजा होता. त्यानं सिकंदराला निरोप पाठवला. ''मी आपल्या भेटीला अवश्य येईन; पण दरबारात नव्हे, रणांगणावर ! हातात तलवार घेऊनच येईन. सज्ज असावं.''

पुरूचा हा निरोप ऐकून सिकंदर बिथरला. त्याच्या शौर्यापुढे कोणी टिकाव धरला नव्हता. हिंदुस्थानमधील एक राजा त्याला बाणेदारपणे उत्तर देत होता. सिकंदरासाठी हे अघटित होतं. त्यानं युद्धाची जोरदार तयारी केली.

सिकंदर आपलं प्रचंड सैन्य घेऊन ईर्षेनं निघाला. झेलमच्या काठावर त्यानं सैन्याचा तळ ठोकला. पुरू राजाही आपलं सैन्य घेऊन अलीकडील काठावर उभा राहिला.

पावसाळ्याचे दिवस होते. मुसळधार पाऊस पडत होता. झेलमचं पाणी दुथडी भरून वाहत होतं. दोन्ही सैन्य नदीच्या तीरावर समोरासमोर उभी होती. नदी पार करून सिकंदराचं सैन्य अलीकडे येईल असं पुरूला वाटलं नाही. म्हणून त्याचं सैन्य थोडं गाफील राहिलं. महत्त्वाकांक्षी सिकंदर मात्र स्वस्थ बसला नाही. झेलमच्या काठाकाठानं तो नदीच्या उगमाकडे गेला. नदीला कुठे उतार मिळतो का हे तो पाहत होता. त्याच्या सुदैवानं तशी जागा त्याला सापडली. झेलम नदीचं पात्र त्या ठिकाणी थोडं अरुंद होतं. तिथे सिकंदरानं दोरांचा पूल बनवला. त्यावरून त्यानं आपलं सैन्य रात्रीच्या अंधारात पलीकडच्या तीरावर नेलं. त्याच्या सैनिकांनी पुरूच्या सैन्यावर अचानक हल्ला चढवला. पुरूचं सैन्यही लढाईसाठी सज्ज झालं. पुरूच्या सैन्यात रथ, हत्ती, घोडे आणि पायदळ होतं. स्वत: पुरू हत्तीवर अंबारीत बसून लढत होता. घनघोर युद्ध झालं. बाणांचा प्रचंड वर्षाव झाला. इतक्यात सिकंदरच्या बाजूनं येणाऱ्या बाणांनी पुरूच्या सैन्यातील हत्ती घायाळ झाले. ते पुरूच्या सैन्याला तुडवत सैरावैरा

धावत सुटले. सगळीकडे गोंधळ उडाला. पुरू रणांगणातून मागे फिरला. तेवढ्यात सिकंदरानं राखीव सैन्य पाठवून पुरूचा पराभव केला.

पकडलेल्या पुरू राजाला सिकंदरासमोर आणण्यात आलं. पुरूची भव्य, धिप्पाड, तेजस्वी मूर्ती पाहून सिकंदर चकित झाला. पुरूचा पराभव झाला होता. त्याच्या अंगावर जखमा झाल्या होत्या; पण त्याच्या मुद्रेवर कसलंही भय नव्हतं. स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांचं तेज त्याच्या मुखावर झळकत होतं. त्याची मुद्रा करारी होती. शत्रूच्या गराड्यातही तो शांतपणे उभा होता. सिकंदरानं त्याला विचारलं, ''राजा, मी तुला कसं वागवावं ?''

पुरूनं बाणेदारपणे उत्तर दिलं. ''तू एक राजा आहेस. मीही राजा आहे. मला राजासारखं वागव.'' पुरूचं ते तेजस्वी उत्तर ऐकून सिंकदराला त्याच्याबद्दल आदर वाटला. त्यानं पुरूला सन्मानानं वागवलं. त्याचं राज्य त्याला परत दिलं.


भारतात खरं मोठं राज्य मगध–वीरांचं होतं. ते जिंकण्याची सिकंदराची तीव्र इच्छा होती; पण त्याचं सैन्य पुढे जाण्यास तयार नव्हतं. सततच्या लढायांनी त्याचे सैनिक थकले होते. घरदार सोडून त्यांना खूप दिवस झाले होते. त्यांना घरी जाण्याची ओढ लागली होती. सैनिकांनीच विरोध केल्यामुळे सिकंदराचा नाइलाज झाला. तो परत फिरला. येताना तो इराण, अफगाणिस्तान या देशातून आला होता. आता त्यानं समुद्रमार्गानं जाण्याचं ठरवलं. झेलम नदीतून होडीनं जात असताना भारतातील लहान लहान राजांनीही त्याला हैराण केलं. त्यांनी एकजूट करून सिकंदरच्या सैन्यावर हल्ला केला. लढाईत एकदा स्वत: सिकंदरही घायाळ झाला. शेवटी त्याचे काही सैनिक समुद्रमार्गानं निघाले. काही बलुचिस्तानच्या वाटेनं गेले. जग जिंकण्याच्या इच्छेनं निघालेल्या सिकंदराचं भारतापुढे काही चाललं नाही. निराश होऊन तो मायदेशाकडे निघाला; पण घरी जाण्याचाही योग त्याच्या नशिबी नव्हता. वाटेतच बॅबिलॉन या शहरी त्याचा अंत झाला. पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी सिकंदर राजाचा अशा रीतीनं शेवट झाला. इ.स. पूर्व ३२३ मध्ये तो मृत्यू पावला. त्यावेळी त्याचं वय अवघं बत्तीस वर्षांचं होतं.

सिकंदराच्या मनात पंजाब आणि सिंध हे प्रांत आपल्या साम्राज्यात सामील करून घेण्याचा विचार होता. म्हणून हिंदुस्थानातून जाताना त्यानं आपले काही सरदार त्या प्रांतांमध्ये ठेवले; पण त्याच्या मृत्यूमुळे त्यांचे सगळे मनोरथ ढासळले. पुढे लवकरच त्याच्या सैन्याची आणि अधिकाऱ्यांची हिंदुस्थानातून कायमची हकालपट्टी झाली.

## सिकंदराच्या स्वारीचे काय परिणाम झाले ?

राजकीयदृष्ट्या सिकंदराच्या स्वारीचा टिकाऊ परिणाम काहीच घडला नाही; पण काही अप्रत्यक्ष परिणाम घडले. या स्वारीमुळे ग्रीक लोकांशी हिंदूंचा परिचय झाला. ग्रीक संस्कृती, शास्त्रे, कला, युद्धपद्धती यांची हिंदू समाजाला माहिती झाली. तसंच ग्रीक लोकांनी भारतीय गणित, ज्योतिष, तत्त्वज्ञान, कला आणि धर्म यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. हिंदुस्थान आणि युरोप यामध्ये दळणवळणाचे मार्ग उघडले गेले. त्यामुळे व्यापारास सुरुवात झाली.

## सम्राट चंद्रगुप्त मौर्य :



''महापद्म नंदानं माझा भयंकर मोठा अपमान केला आहे. या अपमानाचा बदला घेतल्याशिवाय मी शेंडीला गाठ मारणार नाही.''

घोर प्रतिज्ञा करून तक्षशिलेचा विष्णुगुप्त कौटिल्य ऊर्फ चाणक्य निघाला. चाणक्य हा ब्राह्मण होता. तो बुद्धिमान तर होताच, तसाच महान् कारस्थानी होता. नंद राजानं त्याचा अपमान केल्यामुळे तो अत्यंत क्रोधाविष्ट झाला. नंदकुळाचा नाश करण्याची प्रतिज्ञा तो करून बसला होता. आपली प्रतिज्ञा पूर्ण कशी करावी याचा त्याला ध्यास लागला; पण एकटा ब्राह्मण काय करू शकणार !

चाणक्याला रात्रंदिवस चैन पडत नव्हतं. प्रतिज्ञापूर्तीसाठी त्याला एखाद्या प्रबळ व्यक्तीची नितांत गरज होती आणि त्याच्या सुदैवानं त्याला तशी व्यक्ती गवसली. कोण होती ती व्यक्ती ? ती व्यक्ती म्हणजेच हिंदुस्थानचा पहिला सम्राट चंद्रगुप्त मौर्य. चंद्रगुप्ताच्या आईचं नाव होतं मुरा. त्यामुळेच त्याच्या वंशाला मौर्यवंश म्हणतात.

चंद्रगुप्ताचा जन्म इसवी सन पूर्व ३२२ च्या सुमारास झाला. विष्णुगुप्त चाणक्यानं चंद्रगुप्ताला हाती धरून मगध देशात फार मोठी क्रांती घडवून आणली. त्यासाठी त्यानं फार मोठं कारस्थान केलं. त्याच्या या कारस्थानामुळेच महापद्मनंद मारला गेला. खरोखरच चाणक्यानं नंदकुळाचा नाश करून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

''चंद्रगुप्त, तुला आता तुझा राज्यविस्तार करावयाचा आहे.'' चाणक्य चंद्रगुप्तास म्हणाला.

''आपण सल्ला द्यावा. तो मला नेहमीच मान्य असतो. आपल्या सल्ल्यानुसारच मी वागतो.'' चंद्रगुप्त म्हणाला.

''सर्वप्रथम एक काम कर. पंजाबात काही ग्रीक सरदार आहेत. त्यांची शिबंदीही आहे. प्रथम त्यांना हाकलून लावून तो प्रांत आपल्या ताब्यात घे.''

चंद्रगुप्त धाडसी होताच. त्यातून चाणक्यासारख्या बुद्धिमंताशी त्याचा स्नेह जुळला. तो चाणक्याच्या तंत्रानं वागू लागला. चाणक्य हा चंद्रगुप्ताचा मार्गदर्शक होता.

अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर हा मॅसिडोनियाचा राजा फिलिप याचा पुत्र ! अत्यंत पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी होता. त्यानं हिंदुस्थानावर स्वारी केली. त्याला संपूर्ण हिंदुस्थान पादाक्रांत करावयाचा होता; पण त्याची ती मनीषा सफल झाली नाही. हिंदुस्थानातील पंजाब आणि सिंध हे दोन्ही प्रांत त्याला आपल्या घशात घालावयाचे होते म्हणून त्यानं आपले काही गव्हर्नर आणि सैनिकही तिथे ठेवले आणि तो परतला. वाटेतच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्या राज्याचे तुकडे तुकडे होऊन ते त्याच्या सरदारांनी बळकावले. आशिया खंडातील त्याच्या राज्यासाठी अँटिगोनस, सेल्यक्स निकेटर या

सरदारांमध्ये तंटा झाला. सेल्युकसनं बाबिलॉन हे शहर काबीज केलं आणि स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला.

चंद्रगुप्तानं सिंध आणि पंजाब हे दोन्ही प्रांत जिंकून घेतले होते. ते परत मिळविण्यासाठी सेल्युकस सिंधू नदी उतरून पंजाबात शिरला. सेल्युकस आणि चंद्रगुप्त यांच्यात घनघोर लढाई झाली. त्यात सेल्युकसचा पूर्णपणे पराभव झाला.

''मी आपणाशी तह करावयास तयार आहे.'' सेल्युकसनं चंद्रगुप्ताला कळवलं. चंद्रगुप्त तयार झाला.

सेल्युकसनं काबूल, कंदाहार आणि बलुचिस्तान हे प्रांत चंद्रगुप्तास दिले. एवढेच करून तो थांबला नाही; तर त्यानं आपली पुत्रीही त्याला देऊन तह केला. तीन प्रांत आणि सेल्युकसची कन्या या मोबदल्यात चंद्रगुप्तानं त्याला पाचशे हत्ती दिले.

हिंदूकुश पर्वतापर्यंत चंद्रगुप्ताची सरहद्द भिडली. ही सरहद्द नैसर्गिक होती.

सेल्युकसच्या चंद्रगुप्तावर केलेल्या स्वारीचा परिणाम असा झाला की त्यानं आपला वकील मेगॅस्थेनिस याला चंद्रगुप्ताकडे पाठवलं. पाटलीपुत्र ही चंद्रगुप्ताची राजधानी होती. चंद्रगुप्त मगधाधिपती आणि त्याचा महामंत्री होता आर्य चाणक्य !

मेगॅस्थेनिसनं चंद्रगुप्ताच्या दरबारात प्रवेश केला. त्याला चंद्रगुप्ताचा महामंत्री कुठेच आढळला नाही. त्यानं बाजूच्या माणसास विचारलं, ''राज्याचा महामंत्री कुठे आहे ?''

''महामंत्री आपल्या निवासस्थानी बसून राज्याचा कारभार पाहतो.'' त्या माणसानं उत्तर दिलं. मेगॅस्थेनिसनं चाणक्याबद्दल बरंच ऐकलं होतं. तो फार चतुर आहे. चंद्रगुप्त हा चाणक्याच्या सल्ल्यानं चालतो इ. अशा या महामंत्र्याला पाहण्याची मेगॅस्थेनिसला उत्सुकता लागून राहिली. दरबार समाप्त झाल्यावर तो निघाला. वाटेत त्यानं अनेकांना चाणक्याच्या निवासस्थानाबद्दल विचारलं. 'गंगेच्या काठावर ते आहे', असं त्याला अनेकांकडून उत्तर आलं. तो गंगेच्या काठानं निघाला. त्याला ते कुठेच आढळलं नाही. प्रधानमंत्र्याचं निवासस्थान म्हणजे नक्कीच एखादा प्रशस्त महाल असेल असा विचार मेगॅस्थेनिसच्या मनात आला. आपल्याला पथभ्रम तर झाला नाही असंही त्याला वाटलं. त्यानं गंगेकाठी येऊन नावाड्याला विचारलं असता पैलतीरावरील एका कुटीकडे त्यानं अंगुलीनिर्देश केला.

आता तर आपला नेत्रभ्रमही झालाय हे त्याच्या ध्यानी आलं. प्रधानमंत्र्याचं निवासस्थान म्हणजे काय एक कुटी ? कसं शक्य आहे हे ? पण त्यानं जाऊन पाहण्याचं पक्कं केलं. नावाड्याच्या नावेत बसून तो त्या कुटीपर्यंत येऊन पोहोचला. कुटीचं दार नुसतं लोटलं होतं. मेगॅस्थेनिस ते उघडून आत आला. त्यानं कुटीचं निरीक्षण केलं. फारसं काहीच सामान नव्हतं. एक मातीचा घडा भरलेला होता पाण्यानं. एक दिवा जळत होता. एक व्यक्ती मृगाजिनावर बसून भूर्जपत्रावर काहीतरी लिहीत होती. अगदी साधासाच वेश होता. कपाळी टिळा, गळ्यात तुळशीमाळ. कोणाची तरी चाहूल लागली म्हणून त्यानं दिवा विझवला. दुसऱ्या दिव्यात भांड्यातील तेल टाकून तो दिवा पुन्हा प्रज्वलित केला.

''या बसा, आपण कोण ? आपल्या येण्याचं प्रयोजन काय?'' त्या व्यक्तीनं विचारलं.

मेगॅस्थेनिसनं आपला परिचय दिला अन् तो म्हणाला, ''मुनिवर्य, माझ्या येण्याचं प्रयोजन तर आपली कुटी बघूनच पूर्ण झालं; पण मला सांगा, मी आल्यावर आपण एक दिवा विझवलात. भांड्यातील तेल घालून पुन्हा दुसरा लावलात याचं कारण काय ?''

''मी आधी जो दिवा लावला होता त्यात राजकोषातलं तेल होतं. राजकोषातून मला जो निधी मिळाला होता त्यातून मी ते तेल खरेदी केलं होतं. राज्याचंच काम करत होतो; पण पहिला दिवा विझवून मी जो दुसरा दिवा लावला त्यात माझं निजी तेल आहे आणि मी स्वत:चं, माझं वैयक्तिक काम करतोय. तुमच्याशी बोलतोय. राजकोषातल्या पैशानं आणलेल्या तेलात वैयक्तिक काम करणं मला प्रशस्त वाटत नाही.''

त्यावर मेगॅस्थेनिस म्हणाला, ''धन्य आहे हा भारत देश की जिथली शासनव्यवस्था एक त्यागी व्यक्ती बघतेय.''

तर असा हा महामंत्री चंद्रगुप्तला लाभल्यामुळे त्याचा शासनकाळ फार उत्तम तऱ्हेनं व्यतीत झाला.

चंद्रगुप्ताच्या वेळी राज्यपद्धती फार सुसंघटित होती. आधुनिक काळातील सुधारलेल्या राष्ट्रामध्येसुद्धा त्यापेक्षा अधिक चांगली घटना क्वचितच दृष्टीस पडेल. चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीत इतर सर्व घडामोडी प्रमाणेच चाणक्याचाच हात प्रामुख्यानं दिसून येतो.

चंद्रगुप्ताच्या राज्यव्यवस्थेत लष्कर, हेर, उत्पन्न, न्याय, कालवे अन् पाटबंधारे, सार्वजनिक हिताची कामं असे विभाग होते.

त्यावेळच्या परिस्थितीनुरूप लष्कर खातं फारच महत्त्वाचं होतं. चंद्रगुप्ताचं सैन्य हे खंड सैन्य होतं. ते चतुरंग सैन्य होतं. सैन्याचे पायदळ, स्वार, हत्ती आणि रथ असे चार विभाग होते. या सगळ्या सैन्याला वेळच्या वेळी खजिन्यातून पगार मिळण्याची व्यवस्था केलेली होती. या खात्याचा एकंदर कारभार सहा पंचमंडळांकडे होता.



चंद्रगुप्ताच्या सैन्यातील सैनिक याला, तलवार, धनुष्यबाण या हत्यारांचाच प्रामुख्यानं उपयोग करत. पायदळापैकी बऱ्याच शिपायांजवळ त्यांच्या स्वत:च्या उंचीएवढी मोठी धनुष्ये होती. या धनुष्याचं एक टोक जमिनीवर